शुक्रवार दि.७ मार्च २०२५
हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
-ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१७३ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

# अजित पवारांकडे धनंजय मुंडेंच्या खात्याचा अतिरिक्त पदभार कारभार केव्हापर्यंत सांभाळणार अन् नंतर कुणाकडे सोपवणार ?

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

मस्सोजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याकांडमुळे अडचणी आलेल्या धनंजय मुंडेंना मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. यामुळे त्यांच्या जागी आता कोणाला संधी मिळणार? अशा चर्चा सुरू झाल्या असतानाच मुंडेंच्या खात्याचा कारभार अजित पवारांनी आपल्याकडे घेतला आहे. अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण खात्याचा कारभार आपल्याकडे घेतला आहे.सोमवारी संतोष देशमुख यांच्या हत्येचे फोटो समोर आल्यानंतर एकच संतापाची लाट उसळली आहे. यानंतर अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी मंगळवारी धनंजय मुंडे यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला. त्यांच्याकडे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण हे खाते होते. धनंजय मुंडेंच्या राजीनाम्यानंतर त्यांच्याकडील खात्याचा पदभार कोणाकडे जाणार असा प्रश्न उपस्थित झाला होता.धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यानंतर हा विभाग रिक्त होता. मात्र, अर्थसंकल्पीय अधिवेशनात या खात्याशी संबंधित प्रश्न सभागृहात विचारले जाऊ शकतात. त्यामुळे अजित पवार यांनी तूर्तास या खात्याचा कार्यभार स्वत:कडे घेतला. अर्थसंकल्पीय अधिवेशनात या विभागासंबंधीच्या प्रश्नांना आता ते उत्तर देतील. मात्र, अजित पवार हा अतिरिक्त कार्यभार कधीपर्यंत सांभाळणार आणि हे खाते राष्ट्रवादीतील कोणत्या मंत्र्याच्या पदरात टाकणार,याविषयी अद्याप कोणतीही माहिती समोर आलेली नाही.धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यानंतर आता राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये हालचालींना वेग आला आहे. धनंजय मुंडेंच्या जागी आता छगन भुजबळांची सरकारमध्ये एन्ट्री होणार का? अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरु झाली आहे. त्यांच्याकडे दांडगा अनुभव आहे, त्यामुळे आता धनंजय मुंडे यांच्या जागी छगन भुजबळ सक्षम पर्याय आहेत, असे म्हटले जात आहे. तर दुसरीकडे धनंजय मुंडेंच्या जागी बीडमधील आमदारालाच मंत्रिपद देण्याची शक्यता असल्याची चर्चा आहे. प्रकाश सोळंके आणि विजयसिंह पंडित यांच्या नावाची चर्चा सुरू असल्याचे बोलले जात आहे.संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात वाल्मीक कराड हा मुख्य मास्टरमाइंड असल्याचा दावा सीआयडीने दाखल केलेल्या आरोपपत्र केला आहे. वाल्मीक कराड माजी मंत्री धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय मानला जातो. संतोष देशमुख यांची हत्या झाल्यापासून धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात येत होती. पण सरकारने राजीनामा घेतला नाही. दरम्यान, संतोष देशमुख यांना अमानुष मारहाण करतानाचे धक्कादायक फोटो समोर आले. सैतानालाही लाजवेल अशा प्रकारे संतोष देशमुख यांची हत्या केल्याचे या फोटोंमधून दिसून आले. त्यामुळे धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेणे सरकारला भाग होते. त्यांनी तो घेतला.



## इंडियन पँथर सेनेचे जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सेन्सॉर बोर्डला पत्र

# नामदेव ढसाळ कोण? अशी विचारणा करणाऱ्यांवर कारवाई करा-संविधान दुगाने

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । गौतम बनसोडे**

नामदेव ढसाळ कोण? आम्ही ओळखत नाही! असे बेजबाबदार वक्तव्य करणाऱ्या अधिकाऱ्यांना तत्काळ कार्यमुक्त करून त्यांच्यावर फौजदारी कारवाई करण्याची मागणी इंडियन पँथर सेना प्रमुख संविधान दुगाने बडूरकर यांनी जिल्हाधिकारी मा. राहुल कर्डीले यांच्यामार्फत केंद्रीय फिल्म प्रमाणन बोर्डचे अध्यक्ष यांना निवेदन पाठविण्यात आले आहे. दलित पँथर आणि युवा क्रांती दल या चळवळीचा इतिहास सांगणाऱ्या 'चल हल्ला बोल' या चित्रपटातील काही दृश्यांना तसेच पद्मश्री नामदेव ढसाळ यांच्या कवितांवर आक्षेप घेत, कोण नामदेव ढसाळ ? अशी विचारणा सेन्सॉर बोर्ड मधील अधिकाऱ्यांने केल्याने साहित्य आणि सांस्कृतिक विश्वात एकच खळबळ उडाली आहे. महाराष्ट्राचा एक मानबिंदू ठरलेल्या पँथरचाच हा अपमान असल्याने सेन्सॉरच्या या आगाऊपणावर आंबेडकरी संघटनामध्ये असंतोष आहे.



नामदेव ढसाळ कोण, असे विचारणाऱ्यांना त्या पदावर बसायचा नैतिक अधिकार नाही. त्यांच्यावर तत्काळ फौजदारी कारवाई करावी. अशी मागणी दुगाने यांनी निवेदनात केली आहे.

लोकांचा सिनेमा पीपल्स मुखी चळवळीच्या वतीने लोकसहभागातून दलित पँथर आणि युवा क्रांती दल या चळवळीचा इतिहास सांगणाऱ्या 'चल हल्ला बोल' या चित्रपटाची निर्मिती करण्यात आली आहे. दलित अन्याय अत्याचाराची मालिका खंडीत होत नाही.... स्वातंत्र्य कुठल्या गाढ़वीचे नाव आहे.... कधी इथ नांदत नाही... पुरोगाम्याचे कुरखे कधीच फाटलेत, अशा काही कविता या चित्रपटात घेण्यात आल्या आहेत. या कवितांना आणि चित्रपटातील काही रश्यांवर आक्षेप घेण्याची आवश्यकता नाही हे वास्तव आहे.

पद्मश्री कवी नामदेव ढसाळ यांची कविता सदर चित्रपटातून वगळण्यात येऊ नये अन्यथा राजभर आंदोलन पेटेल..ढसाळ कोण? हा प्रश्न म्हणजे हा पँथर नामदेव ढसाळांचा अपमान नसून मराठी भाषीकांचा पर्यायाने महाराष्ट्राचा अपमान आहे. चित्रपटातील वास्तववादी कविताना जर का कात्री लावलात तर महाराष्ट्रात तीव्र आंदोलन छेडण्याचा ईशारा पँथर संविधान दुगाने यांनी दिला आहे.

# निष्काळजीपणे ट्रक्टर चालवल्यामुळे एकाचा मृत्यू

लोकनेता न्यूज नेटवर्क

**कुंडलवाडी । गंगाधर दुसलवाड**

कुंडलवाडी येथील पोलीस स्टेशन अंतर्गत असलेल्या मासनूर येथील शिवारातील नाल्यातून निष्काळजी पणे ट्रक्टर चालवणाऱ्यामुळे राजस्थान येथील एक युवकाचा दिनांक २३ फेब्रुवारी रोजी मृत्यू झाला आहे या घटनेच्या गुन्हा कुडाळवाडी येथील पोलीस स्टेशन मध्ये दिनांक ५ मार्च रोजी दाखल करण्यात आला आहे.कुंडलवाडी शहर परिसरात मोठ्या प्रमाणात हरभऱ्याचे पीक घेतले जातात या पिकाचे काटनेसाठी राजस्थान , बिहार पर राज्यातून मोठ्या प्रमाणात कामगार व मळणी यंत्र समवेत ट्रॅक्टर घेऊन येत असतात त्यांच्या अनुषंगाने दिनांक २३ फेब्रुवारी रोजी दुपारी दोन वाजता शरुनखान हनीफखान वय २९ राहणार छीलोदी तहसील रैनी जिल्हा अलवर राज्य राजस्थान याने माचनुर गावाकडे जात असताना नुर मोहम्मद यांच्या शेताच्या बाजूला असलेल्या नाल्यात स्वतःच्या ताब्यात असलेले ट्रॅक्टर क्रमांक छाआर.जे.०२ आर.जी. २१०५ या क्रमांकाच्या स्वतः निष्काळजी पणे चालवल्यामुळे ट्रॅक्टरचा हेडचे टायर त्या नाल्यात गेल्याने त्याचा तोल जाऊन तो नाल्यात पडला व त्यांच्या अंगावरून ट्रक्टरच्या हेडची चाके दोन्ही पायाच्या मांडीवरून गेल्याने त्याचा पायाचा चंदा मंदा झाल्याने गंभीर जखमी होऊन मरण पावला सदरील घटनेची फिर्यादी इम्तियाज खान कासम खान वय २३ वर्षं व्यवसाय मजुरी राहणार छीलोदी तहसील रैनी जिल्हा अवलर. राज्य राजस्थान यांच्या फिर्यादीवरून गुरन/२०२५ कलम २८१,१२५ ए १२५,बी ऐ १०६१ भारतीय न्याय संहिता नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



# मातंग समाजाला स्मशानभूमी अभावी तळ्याच्या काठावर करावे लागते अंत्यसंस्कार

लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । महेश पडोळे**



उमरी तालुक्यातील मौजे चिंचाळा येथील मातंग समाजाला अनेक दिवसापासून स्मशानभूमी नसल्याने तळ्याच्या काठावर करावे लागते अत्यसस्कार

देशाला स्वातंत्र्य मिळुन जवळपास सतर वर्ष झाली

आजही उमरी तालुक्यातील मातग समाज बाधव अनेक सुविधा पासून वंचित असुन स्मशानभूमी भूमी जागा मिळविण्याकरिता अनेक वर्षापासून शासन दरबारी मागणी केली परंतु यांच्या अत्यंत महत्त्वाच्या मागणीकडे दुर्लक्ष करीत आहे त्यामुळे प्रेताचे अवमान होत आहे. त्याकरिता चिचाळा येथे मातग समाजासाठी स्मशानभूमी साठी जागा उपलब्ध करुन देण्याची मागणी बाधवानी केली असुन याकडे तहसील प्रशासनाने लक्ष दयावे अशी मागणी होत आहे

दिनांक ३ मार्च रोजी चिंचाळा येथील कै. तुकाराम गंगाराम गायकवाड यांचे वृद्धाप काळाने निधन झाले होते यांच्या पश्चात पत्नी दोन मुलं दोन मुली असून ते गंगाधर जयवंत झुंजारे पोलीस पाटील यांचे सासरे होते या अंत्यविधीस गावातील सरपंच उपसरपंच संतोष भायेगावकर डी जी तूपसाखरे (पत्रकार) देवकांबळे शाहीर भोकरकर, रामदास शेबरे इत्यादी मान्यवर उपस्थित राहून श्रद्धांजली अर्पण केली आहे

## तहसीलदार यांच्या मार्फत मुख्यमंत्र्यांना पाठविले निवेदन

# अमानुषपणे गरम रॉडने चटके देऊन मारहाण करणाऱ्या वर कठोर कारवाई करण्याची मागणी-विकास जाधव

लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन । राम शिंदे**

भोकरदन तालुक्यातील आन्वा परिसरातील जानेफळ गायकवाड गावातील पीडित कैलास बोराडे या तरुणाला महाशिवरात्रीच्या दिवशी अमानुषपणे गरम रॉडचे चटके देऊन अमानुषपणे मारहाण केल्याची घटना घडली होती ही घटना माणुसकीला काळीमां फासणारी आहे.

संबंधित घटनेची तात्काळ वस्तुनिष्ठ चौकशी करून दोषी असलेल्या आरोपींना कठोर शिक्षा करण्यात यावी अन्यथा जिल्हाभर व राज्यभर याचे तीव्र पडसाद उमटतील असे निवेदन तहसीलदारामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवले आहे. तसेच तात्काळ दोशी असलेल्या आरोपीवर कारवाई करण्यात यावी व कैलास बोराडे यांना आर्थिक मदत मिळवून द्यावी अशी मागणी निवेदनात त केली आहे. बळीराजा फाउंडेशनचे अध्यक्ष नारायण लोखंडे, स्वराज्य संघटना जिल्हाध्यक्ष विकास जाधव, संदीप भोकरे, राजू ढोके, विष्णू वर्पे, शंकर बोराडे, अमोल घोडके, निवेदनावर स्वाक्षऱ्या व आदींची उपस्थिती होती..





विधानभवन,मुंबई विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२५ - दिवस चौथा नांदेड दक्षिण विधानसभा सदस्य लोकप्रिय आमदार आनंदराव पाटील बोंढारकर साहेब विधानभवनात प्रवेश करतेवेळी.( लोकनेता न्युज नेटवर्क मुंबई )

# देवेंद्रजी लगड,बापुराव आंधळे,आकाश पवार यांचे आष्टी पंचायत समिती कार्यालयमध्ये अभिनंदन करून शुभेच्छा वर्षाव



लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

जिल्हा परिषद बीड सेवा प्रवेशोत्तर परीक्षा २०२३ मध्ये यश संपादन करणाऱ्या श्री.देवेंद्रजी ए.लगड (वरिष्ठ सहाय्यक लेखा),बापुराव एकनाथ आंधळे (कनिष्ठ सहाय्यक),आणि आकाश विजय पवार (कनिष्ठ सहाय्यक) यांचा पंचायत समिती कार्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाला के.ए.महाजन (सहाय्यक प्रशासन अधिकारी),रमेश गाडे (कनिष्ठ लेखाधिकारी),संदीप देशमुख (वरिष्ठ सहाय्यक),रविंद्र राऊत,सचिन रासकर,रोहित सायकड,विष्णू बोडखे,अशोक गोरे,उपसरपंच बाळासाहेब थोरवे (पुंडी),लोकशाही पत्रकार संघाचे बीड जिल्हा उपाध्यक्ष अण्णासाहेब साबळे,बाळासाहेब पोकळे,आणि रंगनाथ काकडे यांनी फेटा व पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले.यावेळी अनेक नातेवाईक,मित्र,आणि हितचिंतकांनी सोशल मीडियावरून तसेच प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष शुभेच्छा दिल्या.उपस्थित सर्वांनी त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

# महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा मोठा निर्णय

लोकनेता न्यूज नेटवर्क **मुंबई (वृत्तसंस्था)**

जात पडताळणी प्रमाणपत्र , उत्पन्नाचा दाखला, रहिवासी प्रमाणपत्र,नॉन क्रिमिलेयर सर्टिफिकेट ,राष्ट्रीयतत्व प्रमाणपत्रासह शासकीय कार्यालयात दाखल करायच्या सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रासाठी जोडावे लागणारे ५०० रुपयांचे मुद्रांक शुल्क (स्टॅम्प ड्यूटी) माफ केल्यामुळे लाखो विद्यार्थ्यांसह कोट्यवधी नागरिकांना दिलासा मिळाला आहे.यापुढे एका साध्या कागदावर स्वसाक्षांकित (सेल्फ अटेस्टेट ) अर्ज लिहून प्रमाणपत्र तहसील कार्यालयातून मिळू शकेल.दहावी, बारावीच्या निकालानंतर विद्यार्थी व पालकांचा या सर्व प्रकारच्या प्रमाणपत्रासाठी लागणारा एकूण ३ ते ४ हजारांचा खर्च वाचणार.निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करण्याचे बावनकुळे साहेब यांनी आदेश दिले आहेत.




# माहूर गडावरील सर्वधर्मीयांचे श्रद्धास्थान असलेल्या माहूर येथील बाबा सोनापीर यांच्या उरसाला सुरुवात

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीक्षेत्र माहूर | प्रतिनिधी**

माहूर गडावरील सरकार सोनापीर बाबा उर्फ हजरत सय्यद सनाऊल्लाह शहा आणि बाबा लंगोटबंद उर्फ हजरत सय्यद हबीबउल्लाह शाह रहेमतुल्ला आलेह यांच्या उरुसाला मोठ्या भक्ती भावात दि ५ रोजी पासून सुरुवात झाली असून दि ५ रोजी सायंकाळी मुजावर बाबर फकीर मोहम्मद आणि सज्ञादा–नशिन साजिद उल्लाह जागीरदार आणि व्यवस्थापक समिती कडून मानाचा दरबारी शाही संदल चढवून मोठ्या भक्ती भावात सर्वधर्मीय बांधवांच्या उपस्थितीत उरुसाला सुरुवात करण्यात आली

अनादी काळापासून बाबा सोनापीर दर्गाह सर्व धर्मीय नागरिकांचे श्रद्धास्थान आहे गेल्या ५६ वर्षापासून बाबा सोनापीर दर्गाह येथे उरुसाचे आयोजन केले जाते या उरुसात सर्व प्रकारची दुकाने प्रसाद फुल लहान मुलांना खेळण्याचे साहित्य झुले मौत का कुवा कपडे पादत्राणे अत्तर मिनाबाजार तसेच विविध खाद्यपदार्थ विक्रीची दुकाने मोठ्या प्रमाणात सजविण्यात आलेली आहेत दि ५ रोजी सायंकाळी पाच वाजता परचम कुशाई आणि आठ वाजता नंतर दरबारी शाही संदल ने सुरुवात करण्यात आली दि ६ रोजी धार्मिक कार्यक्रम तर दि.७ रोजी हजरत मौलाना हसन रजा यांच्या उपस्थितीत फातेहा खानीचा कार्यक्रम होणार आहे दि ८ रोजी पुन्हा धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून दि ९ दररोज प्रमाणे शहरी इफ्तार सह धार्मिक कार्यक्रम ठेवण्यात आलेले आहेत तर आनंद बेले यांच्याकडून मनोरंजनाची भरपूर साधने उभारण्यात आलेली आहेत दरवर्षीप्रमाणे शहरातून मिरवणुकी द्वारे निघणारा शाही संदलचा कार्यक्रम रमजान महिना असल्याने रद्द करण्यात आला आहे.उरसात सर्व धर्मीय बांधवांनी दर्शन तसेच मनोरंजनात्मक कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहन मुजावर बाबर फकीर मोहम्मद सज्ञादा नशिन साजिद उल्लाह जागिरदार तसेच प्रकाशक वसंत कपाटे,विजय आमले, मनोज कीर्तने,अकबर भाई, अब्दुल जब्बार बावाणी सय्यद हारून भाई यांचे सह व्यवस्थापक मंडळांनी केले आहे सहाय्यक जिल्हाधिकारी मेघना कावली यांच्या मार्गदर्शनाखाली यात्रा प्रमुख तहसीलदार किशोर यादव यांच्या यांचे उपस्थितीत मुख्याधिकारी विवेक कांदे नगराध्यक्ष फिरोज दोसानी सपोनी शिवप्रकाश मुळे मराविमचे अभियंता आर बी शेंडे यांचे पोलीस विभाग आणि आरोग्य विभागाचे अधिकारी कर्मचाऱ्यांनी भाविकांना सेवा सुरक्षा दिली



## कळमनुरी मध्ये लमानदेव यात्रा संपन्न

# अनेक भाविकांनी घेतला लाभ पण दिलेल्या देणगीचे मूल्यमापन सार्वजनिक केले नाही

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव | महादेव हरण**

कळमनुरी येथे भरण्यात येणारी संत रामचंद्र सात महाराज यात्रा नुकतीच पार पडली आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाच्या वर्षीही आजूबाजूच्या परिसर व राज्यातील बंजारा समाजातील भाविक मोठ्या संख्येने यात्रेत सहभागी झाले होते

दिनांक ३ फेब्रुवारी रोजी रामचंद्र सात महाराज यांची कळमनुरी शहरातून पालखी काढण्यात आली व दिनांक ४ फेब्रुवारी रोजी प्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. अनेक भाविकांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला. सदरील यात्रेमध्ये भाविकांनी मोठ्या प्रमाणात देणगी



सुद्धा दिली दानपेटीतील रक्कम विश्वस्त मंडळीकडून मोजण्यात आली असता ७४५०० ची दान दानपेटी मधून मिळाली. मात्र भाविकांकडून देण्यात आलेल्या देणगीचे मूल्यमापन करण्यात आले नाही. भाविकांनी श्रद्धेने दिलेल्या देणगीचा हिशोब विश्वस्त मंडळी देत नाहीत. म्हणून काही समाज बांधव याबद्दल आक्रोश व्यक्त करत आहेत. विश्वस्त मंडळीने भाविकांनी श्रद्धेने दिलेल्या देणगीचा हिशोब सार्वजनिक करावा असे समाज बांधवांचे मत आहे.

दरवर्षी लाखो भाविक या ठिकाणी यात्रेनिमित्त येत असतात व आपापल्या परीने जमेल तेवढी देणगी दान संस्थानाकडे देत असतात पण त्यांच्या देणगीचा हिशोब विश्वस्तांकडून दिल्या जात नसल्यामुळे त्यावर समाज बांधवांनी आक्रोश व्यक्त केला आहे.भाविकांनी दिलेल्या दानाची संपूर्ण जमा हिशोब व खर्च हिशोब सार्वजनिक करण्यात यावा अशी मागणी समाज बांधवाकडून करण्यात आली आहे.

# सरपंच/ सदस्य यांना अपात्र केलेला जिल्हाधिकारी यांचा आदेश रद्द करावा

## प्रा.ईश्वर मुंडे यांची आ.जयंत पाटील यांच्याकडे मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**धारूर | प्रतिनिधी**

मागील दोन वर्षांपूर्वी जनतेतून निवडून आलेले राखीव प्रवर्गातील सरपंच व सदस्य यांनी आपले जात वैद्यता प्रमाणपत्र वेळेत सादर केले नाहीत या कारणास्तव श्री अविनाश पाठक,जिल्हाधिकारी बीड यांनी दि.२०/१२/२०२४ रोजी जिल्ह्यातील सरपंच व सदस्य यांना अपात्र केले.

या मध्ये अनेकांनी आपले जात वैद्यता प्रमाणपत्र विहीत मुदतीत सादर केलेले आहे.कांहीचे प्रमाणपत्र मिळाले पण उशीर झाला म्हणून दाखल करून



घेतले नाही.अशा कांही चुका जिल्हाधिकारी,बीड कार्यालयाने केल्या आहेत.नैसर्गिक न्यायाच्या नियमाने संबंधितांना एखादी अंतीम नोटीस देणे अपेक्षीत असते.असे न करता अपात्र ठरवण्याचे आदेश काढणे बेकायदेशीर आहे.अशी कारवाई फक्त बीड जिल्ह्यातच केलेली आहे.तरी विधान सभा अधिवेशनात तारांकीत प्रश्न उपस्थीत करून जिल्हाधिकारी बीड यांचे आदेश रद्द करण्यास शासनास भाग पाडावे अशी विनंती प्रा.ईश्वर मुंडे,महाराष्ट्र राज्य प्रमुख,सेवा निवृत्त अधिकारी सेल,राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्ष यांनी मुंबई येथे आ.जयंत पाटील,प्रदेशाध्यक्ष,राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्ष,महाराष्ट्र राज्य यांना प्रत्यक्ष भेटून लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

# महसूल विभागाचा अवैध वाळू माफियांना दणका

## ७२ तासात ४ माफियांवर कारवाई

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा | ज्ञानेश्वर बुधवत**

मागील काही दिवसांपासून सिंदखेड राजा तालुक्यातील वाळू माफियांना महसूल चे दणके मिळत असून महसूल विभागाने आता ४ वाळू वाहतूक करणाऱ्या वीणा परवाना धारक गाड्यांवर कारवाई केली असल्याची माहिती समोर आली आहे. काल (दि.०६) रोजी ८ वाजेच्या सुमारास हिवरखेड पूर्णा येथील नदी मध्ये अवैध गौण खनिज वाहतूक करणारे २ ब्रास रेतीसह पिवळ्या रंगाचे टिप्पर महसूल विभागाच्या हाती लागले. मात्र टिप्पर मालकाकडे कुठल्याही प्रकारची परवानगी नसल्याने टिप्पर मालक आता अडचणीत सापडला असून. सिंदखेड राजा तहसीलचे तहसीलदार अजित दिवटे यांच्या पथकाने कारवाई करून करून सदरील टिप्पर हा तहसिल कार्यालयात जमा करण्यात आला असून पुढील कारवाई सुरू आहे.

दि.०५ रोजी रात्री ११:४० वाजे दरम्यान तढेगाव फाटा येथे दोन ब्रास रेतीसह टिप्पर वर कारवाई करण्यात



आली आहे. या कारवाई दरम्यान टिप्पर मालकाला परवाना विचारला असता त्यांच्याकडे कोणताही परवाना आढळून आला नाही. त्यामुळे सदर वाहनाचा पंचनामा करून पोलीस ठाणे किनगाव राजा येथे जमा करण्यात आले आहे. सदर सदर कार्यवाही केल्यानंतर या पथकांनी पुन्हा सकाळी पहाटे पहाटे सहा वाजेच्या दरम्यान मौजे सोनोशी शिवारामध्ये अवैध गोन खनिज वाहतूक करणारे वाहन अंदाजे दोन ब्रास रेतीसह पिवळ्या रंगाचे टिप्पर पकडून पोलीस ठाणे सिंदखेड राजा येथे जमा करण्यात आले आहे.

दि. ०४ रोजी देखील तहसीलदार दिवटे यांच्या पथकाने एका अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर वर कारवाई केली असून सदरील ट्रॅक्टर हा किनगाव राजा पोलिस स्टेशन येथे जमा करण्यात आला आहे. मागील ७२ तासात महसूल विभागाने ४ अवैध वाहतूक करणाऱ्या माफियांना दणका दिला असून पुढेही किती कारवाया होतील याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# महाराष्ट्र खो खो निवड चाचणी स्पर्धेसाठी शिवशारदाची कु. ज्ञानेश्वरीची निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**गेवराई | ज्ञानेश्वर उदावंत**

महाराष्ट्र खो- खो स्पर्धेसाठी महिला संघाच्या निवड चाचणीसाठी शिवशारदा पब्लिक स्कूलच्या कु. ज्ञानेश्वरी काळम आणि कॅमसाठी यशराज तिपाले यांची निवड झाली असून त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

महाराष्ट्र खो–खो असोसिएशनची सन २९२४–२५ सालची ६० वि पुरुष महिला राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो –खो स्पर्धा शेवगाव स्पोर्ट बहुउद्देशीय फाउंडेशन सत्यभामा प्रतिष्ठान शेवगाव व अहिल्यानगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे न्युज आर्ट्स ,कॉमर्स आणि सायन्स कॉलेज शेवगाव च्या वतीने दिनांक १३ ते १६ मार्च२०२५ या कालावधीत शेवगाव जिल्हा अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आले आहे.६० व्या पुरुष महिला राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत भाग घेणाऱ्या महाराष्ट्राच्या प्रतिनिधिक संघातील खेळाडू निवडीसाठी ही प्रमुख स्पर्धा असून या स्पर्धेसाठी शिवाजीनगर गढी येथील शिव शारदा पब्लिक स्कूलचे विद्यार्थी कु. ज्ञानेश्वरी प्रदीप कुमार काळम पाटील हीची स्टेट साठी निवड झाली तर यशराज गणेश तिपाले याची कॅमसाठी निवड झाली आहे. या निवडीबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव



पंडित, अध्यक्ष अमरसिंह पंडित, सचिव जयसिंग पंडित, आ. विजयसिंह पंडित, पृथ्वीराज पंडित, शारदा स्पोर्टस अकॅडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित, प्राचार्या शिल्पा क्षीरसागर यांनी अभिनंदन केले. विद्यार्थी खेळाडूंना क्रिडा शिक्षक ज्ञानेश्वर धापसे व विद्या राठोड यांचे मार्गदर्शन लाभले आहे.या दोन खेळाडूंनी चांगल्या खेळाचे प्रदर्शन करून क्रिडा क्षेत्रात यशस्वी वाटचाल केली आहे. भविष्यातही ते चांगला खेळ खेळतील असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# आळंदीत नमामी चंद्रभागा अभियानात इंद्रायणी नदीघाट विकासाचे भूमिपूजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आळंदी देवाची | इम्रान हकीम**

आळंदी : राज्य शासनाच्या नमामी चंद्रभागा अभियान अंतर्गत मंजूर झालेल्या इंद्रायणी नदी घाट विकासाचे कामाचे भूमिपूजन आळंदी नगरपरिषद माजी विरोधी पक्षघटनेते, नगरसेवक डी.डी.भोसले पाटील यांचे हस्ते भूमिपूजन, पूजा, श्रीफळ वाढवीत उत्साहात करण्यात आली.

या भूमिपूजन प्रसंगी प्रशासक तथा मुख्याधिकारी कैलास केंद्रे, माजी नगरसेवक डी. डी. भोसले पाटील, संजय घुंडरे, प्रशांत कुऱ्हाडे, रोहिदास तापकीर, सचिन गिलबिले, दिनेश घुले, प्रकाश कुऱ्हाडे,आनंदराव मुंगसे, अर्जुन मेदनकर, रामदास दाभाडे, आशिष गोगावले, संजय वडगावकर, सतीश कुऱ्हाडे, अभियंता संजय गिरमे, सचिन गायकवाड, प्रसाद बोराटे, अमित घुंडरे, विभाग प्रमुख विष्णुकुमार शिवशरण, बाळासाहेब पेटकर, सागर भोसले, आदी मान्यवर उपस्थित होते.





यावेळी मुख्याधिकारी कैलास केंद्रे यांनी येथील केलेल्या विविध विकास कामांची माहिती देत इंद्रायणी नदी परिसर विकास कामाची माहिती देत संवाद साधला. घाटाचे विकासाचे कामाचा आदेश देण्यात आला असून दिलेल्या आदेशा प्रमाणे तसेच मंजूर निविदे प्रमाणे कामकाज सुरु होत आहे. प्रत्यक्ष कामास सुरुवात झाल्याचे आळंदी नगरपरिषद प्रशासक तथा मुख्याधिकारी कैलास केंद्रे यांनी सांगितले.

आळंदी येथे अस्तित्वात असलेल्या इंद्रायणी नदी घाटाचा जुन्या पुला नजिक असलेला भाग अनेक वर्षांपासून अपूर्ण तसेच काटेरी झुडूपांनी व्यापलेला होता. आषाढी वारी दरम्यान मोबाईल टॉयलेट ची पाहणी करताना मुख्याधिकारी केंद्रे यांच्या निदर्शनास आल्या नंतर त्यांनी यासाठी पाठपुरावा करीत घाटाचे विकासाचे काम आता सुरु करण्यात आल्याचे सांगितले. यामुळे अनेक वर्ष वापरा विना पडून असलेल्या जागेचा वापर भाविकांना दर्शनास जाण्यासाठी घाटाची अतिरिक्त जागा उपलब्ध होत आहे. अपूर्ण जागेत घाट बांधकामाचा परिपूर्ण प्रस्ताव मुख्याधिकारी कैलास केंद्रे यांनी पुणे विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षते खालील नमामी चंद्रभागा अभियानाच्या कृती समितीस दिला होता. त्या प्रमाणे या विकास कामास ३ कोटी ३८ लाख रुपयांच्या खर्चास निधी मंजूर करून शासकीय नियमा नुसार निविदा प्रक्रिया राबविण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

आळंदीतील एस.टी.पी. प्रकल्पाचे काम देखील सुरु कारण्यातआले आहे. यामुळे आळंदीतून वाहणाऱ्या इंद्रायणी नदीचे दुतर्फ़ा सांडपाणी वाहू नलिका काम पूर्ण होताच येतुन वाहणाऱ्या नदीत दूषित पाणी जाणार नाही. यामुळे आळंदी शहरातील सांडपाणी नदी जाणार नाही. यातून नदीचे पावित्र्य जोपासले जाणार आहे. स्काय वॉक लगतचे चांभार घाटाचे कामाचे ही आदेश दिले आहेत. हे ही विकास काम सुरू होणार आहे. नमामि चंद्रभागा उपक्रम अंतर्गत नदी घाटाच्या विकास कामाचे भूमिपूजन प्रशासक तथा मुख्याधिकारी कैलास केंद्रे यांच्या समवेत माजी नगरसेवक डी. डी. भोसले पाटील यांचे प्रमुख हस्ते झाले. यावेळी आनंदराव मुंगसे, संजय घुंडरे, डी.डी. भोसले पाटील आदींनी मनोगते व्यक्त करीत आळंदीतील विकास कामाची माहिती दिली. मुख्याधिकारी केंद्रे यांनी आळंदीत विविध विकासाची कामे मार्गी लावल्या बद्दल या भूमिपूजनाच्या त्यांचे वर कौतुकांचा शब्ध सुमनांनी वर्षाव झाला. यावेळी इंद्रायणी नदी घाटावर जीव रक्षकाचे काम करणाऱ्या शिवशक्ती लोकरे या सेवकाचा सत्कार करण्यात आला.

# वॉशिंग्टन डिजिटल युनिव्हर्सिटीकडून डॉ.बाळासाहेब गदादे सर यांना डॉक्टरेट प्रदान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

१ मार्च २०२५ रोजी, नवी दिल्लीतील हॉटेल हॉलिडे येथे आयोजित आंतरराष्ट्रीय दर्जाच्या दीक्षांत समारंभात प्रतिष्ठित व्यक्तींचा सत्कार करण्यात आला. यावेळी चांडगाव ता.श्रीगोंदा जि.अनगर गावाचे सुपुत्र व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा टाकळीकडेवळीत येथील प्राथमिक शिक्षक डॉ.बाळासाहेब गदादे यांनी आपल्या शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरी व कर्तृत्वाचा गौरव करण्यासाठी त्यांना युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका (यूएसए) च्या वॉशिंग्टन डिजिटल युनिव्हर्सिटीकडून शैक्षणिक कार्यामध्ये डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली.

डॉ.बाळासाहेब गदादे यांची ही उल्लेखनीय कामगिरी केवळ त्यांचे समर्पण आणि कठोर परिश्रमच दर्शवत नाही तर त्यांच्या संबंधित जिल्हा परिषद अहिल्यानगर या स्थानिक स्वराज्य संस्थेला आणि समस्त शिक्षक बंधू भगिणींना अभिमानाची गोष्ट आहे. डॉक्टरेट पदवी मिळणे हा खरोखरच मोठा सन्मान असुन, जी सर्वोच्च शैक्षणिक कामगिरी मानली जाते. हा टप्पा गाठण्यासाठी अनेक वर्षे कठोर अभ्यास, संशोधन आणि समर्पण करावे लागते. डॉ. बाळासाहेब गदादे यांचा संपूर्ण शैक्षणिक प्रवास अनुकरणीय राहिल.मुंबईतील बालमित्र गुरुवर्य ड.(डॉ.) रावसाहेब दरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली, डॉ. गदादे यांनी केवळ त्यांच्या शैक्षणिक कार्यातच उत्कृष्ट कामगिरी केली नाही तर त्यांच्या अभ्यासाच्या क्षेत्रातही मोठे योगदान दिले आहे. त्यांच्या कारकिर्दीला आकार देण्यात आणि त्यांना



ही प्रतिष्ठित पदवी प्राप्त करण्यात मदत करण्यात डॉ. दरेकर यांच्या मार्गदर्शनाने आणि पाठिंब्याने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. डॉ. गदादे यांची शिक्षणाची आवड ,त्यांना नवनवीन शिक्षण पद्धती आणि धोरणे शोधण्यास प्रवृत्त करते. परिणामी, ते आपल्या विद्यार्थ्यांना शिकवण्याचा अनुभव बदलू शकले आणि देशातील सर्वोत्तम शिक्षकांपैकी एक म्हणून ओळखले गेले आहे. अध्यापनासाठीचे त्यांचे समर्पण आणि वचनबद्धतेचा केवळ त्यांच्या विद्यार्थ्यांवरच नव्हे तर संपूर्ण शिक्षण व्यवस्थेवरही लक्षणीय परिणाम दिशादर्शक ठरेल. डॉक्टरेट पदवी प्राप्त करणे ही केवळ वैयक्तिक उपलब्धी नाही, तर ते एखाद्याचे कुटुंब, मित्र आणि सहकारी यांचे समर्थन आणि प्रोत्साहन देखील प्रतिबिंबित करते. डॉ. गदादे हे भाग्यवान आहेत की त्यांना त्यांच्या प्रियजनांचा आणि मित्रपरिवाराचा अतुट पाठिंबा मिळाला, ज्यामुळे त्यांना हा टप्पा गाठण्यात मदत झाली.त्यांच्या या यशाबद्दल गटशिक्षण अधिकारी सत्यजित मच्छिंद्र साहेब, जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी निळकंठ बोरुडे साहेब, सिताराम भुजबळ साहेब, केंद्र प्रमुख माणिकराव आढाव साहेब, चांडगावचे सरपंच रविनाना म्हस्के, भाजपा नेते राजेंद्र म्हस्के, टाकळीचे सरपंच प्रफुल्ल इथापे, उपसरपंच डॉ.सुभाष देशमुख, युवा उद्योजक सुदाम खामकर, शाळा. व्यवस्थापन समिती अध्यक्ष कैलास नवले सर्व ग्रामस्थ, विद्यार्थी, शिक्षक, पालक यांच्यातर्फे त्यांचा सत्कार करुन त्यांचे अभिनंदन केले.

# केवायसी करण्यासाठी ३१ मार्चची अंतिम मुदत; ‘मेरा ई-केवायसी’ अ‍ॅप उपलब्ध

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**किनवट । दशरथ आंबेकर**

शासनाने शिधापत्रिकाधारकांना ई-केवायसी करणे बंधनकारक केले आहे. ई केवायसी न केल्यास त्यांना धान्य मिळणार नाही. स्वस्त धान्य दुकानातून ई-पॉस मशीनद्वारे मोफत केवायसी केले जात आहे. परंतु, लहान मुले आणि वृद्धांच्या बोटांचे ठसे आणि डोळ्यांद्वारे स्कॅन करताना अडचणी येत आहेत. त्यामुळे लाभार्थ्यांना स्वस्त धान्य दुकानात न जाता काही मिनिटांत मोबाइलवरून त्यांच्या कुटुंबाचे केवायसी पूर्ण करता येणार आहे. यासाठी शासनाने ’मेरा ई-केवायसी’ हे अ‍ॅप उपलब्ध करून दिले असून, केवायसी करण्यासाठी ३१ मार्च अंतिम मुदत आहे.या मुदतीत सर्वांनी ई-



केवायसी करून घ्यावे,असे आवाहन किनवट तालुका पुरवठा अधिकारी निलेश राठोड यांनी केले आहे.

सार्वजनिक वितरण प्रणालीअंतर्गत लाभार्थींना रास्त भावात धान्याचे वितरण केले जाते. ई-पॉस मशीनद्वारे धान्याचे वितरण केले जात असले तरी तांत्रिक अडचणी आल्यास ओटीपीचा वापर करून धान्याची उचल लाभार्थीला करता येते. परंतु, संबंधित लाभार्थीचा मोबाइल क्रमांक शिधापत्रिकेशी संलग्न असणे आवश्यक आहे. स्वस्त धान्याचे वितरण करताना स्वस्त धान्य दुकानदारांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे धान्य दुकानदारांकडे ग्राहकांकडून अनेक तक्रारीसुद्धा प्राप्त होतात. अशा प्रकारांवर आळा बसावा, स्वस्त धान्याचे वितरण सुरळीत व निकोप पद्धतीने व्हावे, यासाठी ई-पॉस मशीनवर धान्याचे वितरण केले जात आहे. तालुक्यात अनेक रेशन कार्डधारकांनी मोबाइल नंबर लिंक केलेला नाही.त्यामुळे शिधापत्रिकाधारकांनी आपला मोबाइल नंबर शिधापत्रिकेशी लिंक करा,असेही पुरवठा विभागातर्फे सांगण्यात आले आहे.

शिधापत्रिका धारकांना केवायसी करण्यासाठी शासनाने वेळोवेळी मुदत वाढवून दिली. पण, अद्यापही शिधापत्रिकाधारकांनी विविध कारणे देत टाळण्याचा प्रयत्न केला. शासनाने पुन्हा केवायसी करण्यासाठी आता ३१ मार्च अंतिम मुदत दिली.तालुक्यातील अनेक व्यक्तिंचे ई-केवायसी झाले नसल्याचे पुरवठा विभागाने सांगितले.

# स्पर्धा परीक्षेची तयारी करत असताना अपयशाची भीती बाळगू नका-भाग्यश्री देशमुख



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

स्पर्धा परीक्षेची तयारी करत असताना सातत्य ठेवणे गरजेचे असून अपयशाची भीती बाळगू नका असे मत भाग्यश्री श्रीपाद देशमुख यांनी मांडले.

नुकताच महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या महसूल सहाय्यक पदाचा निकाल जाहीर करण्यात आला. यात अंबाजोगाईची रहिवाशी कु. भाग्यश्री श्रीपाद देशमुख यांनी यश संपादित केल्याबद्दल पेशवा प्रतिष्ठान तर्फे सत्कार करण्यात आला.

प्राथमिक आरोग्य केंद्र घाटनांदूर येथे कार्यरत श्रीपाद देशमुख यांच्या मुलीच्या या यशाबद्दल पालकांचा ही सन्मान करण्यात आला. यावेळी प्रतिष्ठान चे शिरीष हिरळकर, डॉ.महेश अकोलकर, श्रीकांत जोशी, गोविंद जोशी, अँड.वैजनाथ वांजरखेडे, पार्थ कुलकर्णी, अधिराज कुलकर्णी, रुपेश देशमुख, तुषार जोशी, श्रीपाद देशमुख, कल्याणी कुलकर्णी , स्मिता भातलवंडे, रेणुका भालेराव, प्रणिता पोखरीकर, श्रेया जोशी, ममता दीक्षित, तृप्ती जोशी, वैशाली देशमुख यांची उपस्थिती होती.

# क्रीडा गुणांसाठी ५ एप्रिलपर्यंत प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । गोविंद मोरे**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नांदेडच्यावतीने इयत्ता १० वी व १२ वीच्या परिक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या खेळाडू विदयार्थ्यांना शासन निर्णयानुसार सवलतीचे वाढीव गुण देण्यात येतात. यासाठीचे ऑनलाईन प्रस्ताव ५ एप्रिल, २०२५ पर्यंत सादर करावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांनी केले आहे.

शासन निर्णयानुसार जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या कडुन क्रीडा प्रस्ताव दरवर्षी विभागीय शिक्षण मंडळाकडे ३० एप्रिलपर्यंत सादर केले जातात. तथापी, शैक्षणीक वर्षे सन २०२४-२५ या वर्षात माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा



(इयत्ता १० वी व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा इयत्ता १२ वी) या परीक्षा नेहमीपेक्षा १० दिवस अगोदर आयोजित करण्यात आले आहेत. या परिक्षेचा निकाल १५ मे, २०२५ पर्यंत जाहीर करावयाचा आहे. त्यामुळे क्रीडा गुण सवलतीचे प्रस्ताव जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नांदेड यांच्यामार्फत विभागीय शिक्षण मंडळाकडे १५ एप्रिल,२०२५ पर्यत ऑनलाईन सादर करणे आवश्यक आहे.तरी जिल्हयातील सर्व मुख्याध्यापक, प्राचार्य, क्रीडा शिक्षण व विदयार्थी यांनी त्यानुषंगाने ५ एप्रिल २०२५पर्यंत आपले सरकार या पोर्टलच्या माध्यमातून ऑनलाईन प्रस्ताव भरून घ्यावेत. त्यानंतर कोणत्याही प्रकारचे क्रीडा गुणांचे प्रस्ताव क्रीडा कार्यालयामार्फत स्विकारले जाणार नाहीत. खेळाडूं विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या संभाव्य नुकसानीस संस्था/ शाळा सर्वस्वी जबाबदार राहील, याची संबधीतांनी नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी केले आहे.

# केसराळी येथे २ रा अखंड शिवनाम सप्ताह संपन्न

## ग्रंथराज परमरस्य पारायण व शिवपाठ रिंगण सोहळ्याचे आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । किरण पाटील वडजे**

बिलोली तालुक्यातील केसराळी येथे २ रा अखंड शिवनाम सप्ताह ग्रंथराज परमरस्य पारायण व शिवपाठ रिंगण सोहळा संपन्न झाला. श्री १०८ ष.ब्र. राष्ट्रसंत डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपुरकर यांच्या प्रेरणेने श्री १०८ ष.ब्र. शिवानंद शिवाचार्य महाराज तमलूरकर व श्री १०८ ष.ब्र. सिद्धदयाळ शिवाचार्य महाराज बेटमोगरेकर व श्री गुरूवर्य राजशेखर शिवलिंगशिवाचार्य महाराज अहमदपूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली केसराळी ता. बिलोली जि. नांदेड येथे २ रा अखंड शिवनाम सप्ताह दि. २८-०२-२०२५ रोज शुक्रवार सुरू होऊन दि. ७-०३-२०२५ रोज शुक्रवारी समाप्ती होणार असून दिनांक ६ मार्च २०२५ रोजी संपूर्ण गावांमध्ये मोठ्या उत्साहात शोभायात्रा काढण्यात आली या शोभायात्रेमध्ये केसराळी गावातील व परिसरातील हजारो शिवभक्त तसेच गावातील सर्व नागरिक व वृद्ध पुरुष महिला बालकांनी सहभाग घेतला.





# शिऊर ते नदीवाडी पाणंद रस्त्यासाठी पुन्हा १७ मार्चपासून आमरण उपोषणाचा इशारा

## बीडीओ व ग्रामसेवकाचा हलगर्जीपणा;शंभर मीटर पर्यंतचाच अर्धवट ओबडधोबड रस्ता करून केला खोळंबा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**निलंगा । इस्माईल महेबूब शेख**

निलंगा तालुक्यातील शिऊर ते नदीवाडी हा दोन वर्षांपासून मंजूर असलेल्या पाणंद रस्ता होण्यासाठी शिऊरच्या शेतकऱ्यांनी निलंगा पंचायत समितीसमोर अनेकवेळा उपोषण केले. लेखी आश्वासन देऊनही रस्त्याचे काम झाले नाही. त्यामुळे लातूरच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करण्यात आले. रस्त्याचे काम सुरु केल्याचे नाटक करण्यात आले. २८ फेब्रुवारी पर्यंत रस्ता करून देतो म्हणून आश्वासन देण्यात येऊन उपोषण सोडवण्यात आले. मात्र शिऊर ते नदीवाडी पाणंद रस्त्याचे काम पूर्ण करण्यात आलेच नाही. त्यामुळे संपूर्ण रस्ता बांधकाम नीट करून द्यावे, या मागणीसाठी पुन्हा लातूर जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी बी. डी. वाघ यांना शेतकऱ्यांनी ५ मार्च रोजी निवेदन देऊन जर रस्ता झाला नाही तर पुन्हा १७ मार्च पासून लातूर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा एका निवेदनाद्वारे दिला आहे. सदर रस्त्याच्या कामात दिरंगाई करणाऱ्या संबंधित गटविकास अधिकारी व ग्रामसेवकविरुद्ध कार्यवाही करावी. या रस्त्याच्या कामात राजकारण करणाऱ्या विरुद्ध कडक कार्यवाही करून सदरचा रस्ता तात्काळ करून देण्यात यावा. जो पर्यंत रस्त्याचे काम होणार नाही, तो पर्यंत आमरण उपोषण सुरूच राहील. असा इशारा शेतकरी अरुण अष्टुरे, नामदेव तुगावे, शेषेराव बिरादार, दिलीप सूर्यवंशी, सौ. सरोजा अष्टुरे, सौ. वत्सलाबाई सूर्यवंशी, भरत सूर्यवंशी, सुशीलाबाई अष्टुरे, हिरकणबाई तुगावे, शिवराज अष्टुरे आदी शेतकऱ्यांनी दिला आहे.



# धानोरा बु.येथे भव्य ९ मार्च रोजी श्री.महालक्ष्मी यात्रा महोत्सव जंगी कुस्त्याची दंगल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । महेश पडोळे**

उमरी:–मौजे रावधानोरा (बु) येथे महालक्ष्मी व श्री धुरपत मातेच्या भव्य यात्रा महोत्सव कुस्ती दंगल ९ मार्च रोजी आयोजित केला आहे यात दुकानदारांनी कुस्तीगीरांनी या सुवर्ण संधीचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन गावकऱ्यांनी कूला आहे. यात यात्रेचे कार्यक्रम खालील प्रमाणे आळंक्या कार्यक्रम दि.७ – ३ – २०२५ रोज शुक्रवार सायं. ठिक ०६:०० वा.देवीची पालखी दि.८ – ३– २०२५ रोज शनिवार पहाटे ०५:०० वा.

दिनांक ९–३–२०२५ रोज रविवार दुपारी ०२:००वा. जंगी कुस्त्याची दंगल होईल.पहिल बक्षीस कै. डी. बी. पाटील होटाळकर १५, ५५१/श्री. शिवराज पाटील होटाळकर(मा.शिक्षण सभापती जि.प.नांदेड) यांच तर दुसरं बक्षीस –७७७७/–स्मरणार्थ कै. लक्ष्मण संभाजीराव हाडोळे यांच्या स्मरणार्थ साईनाथ संभाजीराव हाडोळे तिसरा बक्षीस ५५५५/– शिवानंद दत्तराव देशमुख यांचे श्री.साई ट्रेडींग कंपनी, धानोरा बु. यांच्या तर्फे ५५५५/– कै.भुजंगराव पा. बोळसेकर ५५५५/–यांच्या स्मरणार्थ राजू पाटील बोळसेकर यांच्या (सदस्य, कृषी उत्पन्न बाजार समिती, धर्माबाद) २५२५/–श्री.ईरबा तुकाराम टोम्पे (सरपंच, रावधानोरा बु.) यांच्या कै. लक्ष्मीबाई बाबाराव मामडे यांच्या स्मरणार्थ मामडे परिवाराच्या वतीने २५००/–कै. हारी शंकर चव्हाण यांच्या स्मरणार्थ श्री.भिमराव हारी चव्हाण यांच्या तर्फे ५५५५/–कै. ईरन्ना देवबा वाडीकर यांच्या स्मरणार्थ श्री. शिवाजी ईरन्ना वाडीकर यांच्या तर्फे ३३३३/–कै.उमाजी पिराजी डोकळे यांच्या स्मरणार्थ श्री. माधव उमाजी डोकळे यांच्या २५००/–याही पुढे अनेक बक्षिसे ठेवली आहेत. सदर,७ मार्चपासून महालक्ष्मी यात्रा महोत्सवाला प्रारंभ होत





असून,यानिमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.उमरी तालुक्यात प्रसिद्ध असलेले महालक्ष्मी माता व धुरपत माता देवीचे मंदिर धानोरा (बु.)येथे आहे. दरवर्षी येथे महालक्ष्मी मातेची भव्य यात्रा भरते. तालुक्यातील, परिसरातील तेलंगणा राज्यातूनही भाविक– भक्त मोठ्या संख्येने मातेच्या दर्शनासाठी गर्दी करतात. यानिमित्ताने गावकऱ्यांच्या वतीने चोख व्यवस्थेसह भव्य महापूजा, लोकसंगीत,कुस्त्यांची दंगल इत्यादी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. मुलांची खेळणी, भांडी, कापड, फळफळावळ, मिठाई, हॉटेल, शृंगार साहित्य, आकाशी पाळणे इत्यादी दुकाने थाटल्याने यात्रेला भव्य स्वरूप येते. या महोत्सवाची सुरुवात ७ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता देवीच्या आळंका कार्यक्रमाने होणार असून, यात गावातील बहुसंख्य महिला मोठ्या उत्साहाने भाग घेतात. यानंतर ८ मार्च रोजी पहाटे ५ वाजता माता महालक्ष्मी देवीची पालखी मिरवणूक धानोरा नगरीतून निघेल. यात शेकडो महिला, नागरिक सहभाग घेतील. यासह ९ मार्च रोजी दुपारी २ वाजता जंगी कुस्त्यांची दंगल होणार आहे. यात महाराष्ट्रासह, तेलंगणा, कर्नाटक राज्यांतून पहेलवान आपला सहभाग नोंदवतात. या दंगलीसाठी जिल्हाभरातील अनेक मान्यवरांकडून कुस्तीच्या डावासाठी मोठमोठ्या रकमेच्या बक्षिसांची घोषणा केली आहे. या यात्रा महोत्सवाला भव्य स्वरूप येण्यासाठी तालुका परिसरातील दुकानदार, यात्रेकरू,खेळाडू, भाविक भक्त, बाळगोपाळ, महिला, नागरिक यांना सहभाग नोंदवण्याचे आवाहन आयोजक गावकऱ्यांनी केला आहे. धानोरा बु.हे गाव उमरी पासून,८ किमी अंतरावर आहे.

## स्व.संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ भोकरदन बंद



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन । राम शिंदे**

स्व.संतोष देशमुख यांना अमानुषपणे मारहाण करून त्यांची क्रूरपणे हत्या केल्याचे फोटो माध्यमातून समोर आले आहे. या घटनेचे तीव्र पडसाद संपूर्ण राज्यामध्ये उमटत असून या घटनेच्या निषेधार्थ भोकरदन येथे ६ मार्च रोजी समाज बांधवांच्या वतीने व सकल मराठा समाज क्रांती मोर्चा भोकरदन च्या वतीने भोकरदन बंद ठेवून आरोपींना फाशीची शिक्षा व्हावी म्हणून, मा पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन भोकरदन यांना निवेदन देऊन या निवेदनात भोकरदन तालुक्याच्या वतीने भोकरदन शहर ६ मार्च रोजी कडकडीत बंद ठेवण्यात आले..

## मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेतील लाभार्थ्यांची पहिली रेल्वे नांदेड येथून ८ मार्च रोजी होणार रवाना

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव पाटील गायकवाड**

मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेत नांदेड येथून अध्योध्या धाम येथे जाण्यासाठी पहिली रेल्वे शनिवार ८ मार्च २०२५ रोजी रवाना होणार आहे. या योजनेतील पात्र लाभार्थ्यानी आपले नाव पात्र यादीत आहे किंवा कसे याची खात्री ७ मार्च २०२५ पर्यत कार्यालयीन वेळेत करुन घ्यावी. तसेच अयोध्या धामला जाण्यासाठी तयार रहावे, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी केले आहे.



राज्यातील नागरिकांना देशातील मोठया तीर्थ स्थळांना जावून , मनशांती तसेच आध्यामिक पातळी गाठणे सुकर व्हावे यासाठी राज्यातील सर्व धर्मातील जेष्ठ नागरिक, जे ६० वर्ष किंवा त्याहून अधिक वयाचे आहेत. त्यांना राज्य आणि भारतातील तीर्थ क्षेत्राना मोफत दर्शनाची संधी देण्यासाठी मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना १४ जुलै २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये कार्यान्वीत झाली आहे. या योजनेत नांदेड येथील अध्योध्या धाम तीर्थ क्षेत्रासाठी अर्ज केलेल्या पात्र लाभार्थ्यांची निवड यादी समाज कल्याण कार्यालयाच्या सूचना फलकावर लावण्यात आलेली आहे. तर तसेच संबंधिताना मोबाईलद्वारे संपर्क करण्यात येत आहे, तरी सर्व पात्र जेष्ठ लाभार्थी नागरिकांनी याची नोंद घ्यावी, असेही समाज कल्याण कार्यालयाने प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## माहूर तालुका क्रीडा संकुलासाठी पाच कोटी पैकी एक कोटी रुपये निधी प्राप्त; लवकरच भूमिपूजन–आ.भिमराव केराम

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**माहूर । राजकिरण देशमूख**

क्रीडा व युवक सेवा आयुक्त पुणे यांनी माहूर येथील तालुका क्रीडा संकुलासाठी ५ कोटी पैकी १ कोटी रुपयाचा पहिला हप्ता दि.५ मार्च २०२५ रोजी मंजूर केला आहे.या कामाचे लवकरच भूमिपूजन केले जाईल अशी माहिती किनवट /माहूर विधानसभा मतदार संघाचे कार्यकुशल आ.भिमराव केराम यांनी दिली आहे.

माहुर तालुक्यात विविध क्रीडा क्षेत्रातील खेळाडूंची वाढती संख्या, सोई,सुविधा,साधने, मैदान, अनुभवी प्रशिक्षक आदी बाबींचा अभाव व अनेक स्पर्धेतून क्रीडा क्षेत्रात माहुर तालुक्याचे नाव मोठे करणाऱ्या खेळाडूंची गरज लक्षात घेऊन क्रीडा समीती सदस्य / प्रशिक्षक सुरेश गिन्हे, भाजपा ओबीसी आघाडीचे प्रदेश चिटणीस अनिल वाघमारे व नगरसेवक सागर महामुने यांनी आ.भिमराव केराम यांच्याकडे सारखा पाठपुरावा केला होता. आ. केराम यांनी शासनस्तरावर अविरतपणे ही बाब



लावून धरली होती.सदर तालुका क्रीडा संकुल पांडवलेणी जवळील २–५० एकर शासकीय जागेवर निसर्गाच्या सानिध्यात उभारले जाणार आहे.क्रीडा संकुलाचा मार्ग प्रशस्त करून दिल्याबद्दल प्रशिक्षक क्रीडा समीती सदस्य सुरेश गिन्हे,नगरसेवक सागर महामुने,अनिल वाघमारे यांनी आ.भीमराव केराम यांचे आभार मानले आहे. क्रीडा संकुलात अंतर्गत व बाह्य क्रीडांगणांचा समावेश असून बॅटमिंटन हॉल, बास्केट बॉल, जिमनॅस्टिक, ज्यूडो,कराटे, पॉवर लिफ्टींगसह २०० मिटरचा ट्रॅक आदी सुविधा उपलब्ध असेल.अशी माहिती जिल्हा क्रीडाधिकारी जयकुमार टेंभरे यांनी दिली.माहूर तालुक्यातील दुर्गम व आदिवासी भागातील खेळाडूंसाठी ही मोठी पर्वणी असेल क्रीडा प्रशिक्षक / क्रीडा समिती सदस्य ...सुरेश गिन्हे

## ठाणेदार धनराज निळे यांना समाज रत्न पुरस्कार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**महागाव! विजय थोरात**

महागाव विविध ठिकाणी आपल्या कार्यातून कामाचा ठसा उमटून समाजामध्ये नावलौकिक निर्माण करणारे दबंग शांत संयमी सध्या महागाव महागाव पोलीस स्टेशन मध्ये रुजू असलेले ठाणेदार धनराज दौलतराव निळे यांना २०२५ चा राज्यस्तरीय समाज रत्न पुरस्कार यशवंत संघर्ष सेना महाराष्ट्र राज्य च्या वतीने जाहीर करण्यात आले, असल्याचे यशवंत संघ सेना चे संस्थापक अध्यक्ष विष्णू कुन्हाडे यांनी सांगितले असून



धनराज यांनी त्यांच्या आतापर्यंतच्या कार्यकाळातील कार्यांची दखल पाहता हा समाज रत्न पुरस्कार जाहीर झाला असून मोठ्या थाटामाटात हा पुरस्कार त्यांना प्रदान करणार असल्याचे यशवंत सेनेचे अध्यक्ष विष्णू कुन्हाडे यांनी जाहीर केल्याने ठाणेदार धनराज निळे यांच्यावर सर्वत्र कडून शुभेच्छा वर्षा होत आहे.

# संसाराचा शेवट असतोच,पण परमात्म्यास अंत नसतोच!–श्री संत एकनाथ नामदेव महाराज

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

कंधार तालुक्यातील तीर्थक्षेत्र उमरज येथील श्री संत सद्गुरू नामदेव महाराज मठ संस्थानात श्री विठ्ठल–रुक्मिणीच्या मंदिराचा सुवर्ण कलशारोहण सोहळा,तसेच १०८ कुंडी विष्णूयाग यज्ञ व अखंड हरिनाम सप्ताह आणि देवकिनंदन ठाकूर यांचा सुश्राव्य वाणीतून श्रीमद् भागवत कथा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाराष्ट्र, तेलंगणा, आंध्रप्रदेश, कर्नाटक या चार राज्यांतील अठरापगड जाती–धर्माच्या लाखों भाविकांनी या धार्मिक कार्यक्रम व महाप्रसादाचा लाभ घेतला

दि.६ मार्च रोजी श्री संत नामदेव





महाराज काल्याच्या किर्तनात म्हणाले संसाराचा शेवट असतो,पण परमात्म्याला शेवटच नसतो! संसारात कधी पण सुख नसते,संसार दुःखाचा आहे,पृथ्वी तलावर सुखी कुणीही नाही,असे प्रतिपादन श्री संत नामदेव महाराज संस्थानचे मठाधिपती महंत एकनाथ नामदेव महाराज म्हणाले, पुढे बोलतांना संसारात सुख असले,तर आपण एवढ्या मोठ्या संख्येने येथे जमलोच नसतो,दुःखाची निवृती करायचे असले तर धर्म मंडपात येऊन प्राप्ती करून घ्याचे म्हणून आपण आलोत, पृथ्वी तलावर सुख कशात असेल तर देवाकडे आणि संताकडे सुख मिळेल असे बोलतांना महाराज म्हणाले, यावेळी हजारो भाविक भक्तांची उपस्थिती होती.पुढे बोलतांना महाराज म्हणाले ज्या दिवसी दि.२६ ऑगस्ट २००७ श्री संत सद्गुरू नामदेव महाराजांच्या गादीवर बसलो त्या दिवसी मी चहा पिण्यास जायचे तेव्हा माझ्या कडे २ रुपये चहा पिण्यास नव्हते,तेव्हा पन्नास–पन्नास पैसे जमा करून चहा घेतला त्याच दिवसी मी रात्रीत करोडपती झालो,मला नामदेव महाराजांनी हाताला धरले,मला एवढे दिली,कि मी सांगुच शकत नाही,तसेच काल्याच्या महाप्रसादाचे १०० कुंटलाचे आयोजन करण्यात आले आहे,यावेळी राजकारणातील मातब्बर कंधार–लोह्याचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर,मोहन अण्णा हांबर्डे ,मुक्तेश्वर धोंडगे,प्रविण पाटील चिखलीकर,पंढरपुरचे हरिदास महाराज,रोहिदास चव्हाण, मधुकर पा डांगे,बाबुराव केंद्रे,किशन डफडे, चैतन केंद्रे,राजीव कोकाटे, असिफ शेख,गंगाधर कांबळे,नरेंद्र गायकवाड, माणिकराव मुकदम (लोहा),किरण वट्टमवार,बालाजी चुकलवाड आदींसह उपस्थित होते,

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904